# वसतिगृह प्रवेश सूचना

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत, खुल्या तसेच **SEBC** प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थी/विद्यार्थिनी साठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) परिसर औंध, पुणे येथे वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी, बिगर व्यावसायिक उच्च शिक्षण अभ्यासक्रमासाठी आणि इयत्ता 11 वी व 12 वी साठी पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या इच्छुक विद्यार्थी/विद्यार्थिनींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सविस्तर माहिती अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रे http://punehostel.wordpress.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत पूर्ण भरलेले अर्ज योग्य त्या कागदपत्रांसह दि. 01/07/2025 ते 30/07/2025 पर्यंत डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) औंध, पुणे 411007 या पत्त्यावर जमा करावेत.

अधिक्षक, **सीबीएसएस संचलित**
**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह**
मोबाईल +91 8530753395

Scanned with OKEN Scanner

डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विदयार्थ्यांकरीता

**वसतिगृह प्रवेश अर्ज.**

---

| कलर पासपोर्ट फोटो |
|---|

१.विदयार्थ्यांचे पुर्ण नांव :-

२.विदयार्थ्यांचा कायमचा पत्ता :-

३.लिंग : पुरुष/महिला :

४.जन्म दिनांक

५. विदयार्थ्याचा मोबाईल नं.व ई-मेल आयडी :-

६.पालकाचा मोबाईल नंबर :-

७. जात व प्रवर्ग :-

८.प्रवेश घेतलेल्या संस्थेचे नांव व पत्ता :-

९.प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव :-

१०.अपंगत्व आहे काय ?
( असल्यास प्रमाणपत्र जोडणे )
११.वडील स्वातंत्र्य सैनिक आहेत काय ?

१२. विदयार्थ्यांचे व पालकाचे मिळुन एकुण वार्षीक उत्पन्न रुपये :-

**विदयार्थ्यांची स्वाक्षरी**

टिप : वसतिगृह प्रवेश नियम अटी व शर्ती शासन निर्णय ,उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र २४९/तांशि-४, दिनांक १३ जुलै २०१८ नुसार लागु राहतील.

( मागे पहा .....)

## अर्जदार विदयार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र

मी ----------------------------------------------------वय ------- रा.------------------------

असे लिहुन देतो की, सदर प्रवेश अर्जांत भरलेली माहिती व सोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी आहेत. वसतिगृहातील वास्तव्य कालावधीत माझ्याविरुध्द संबंधित वसतिगृहाचे वार्डन वा महाविदयालयाकडुन कोणतीही शिस्तभंगाविषयक कारवाई झालेली नाही किंवा माझ्या गैरवर्तणुकीबाबत संबंधित वसतिगृहाचे वॉर्डन वा संबंधित महाविदयालयाचे प्राचार्य यांनी आक्षेप घेतलेला नाही. आधीच्या शैक्षणिक वर्षात दिलेली परीक्षा उत्तीर्ण झालो असुन अनुत्तीर्ण असल्यास वसतिगृहात प्रवेश देण्यात येणार नाही याची मला जाणीव आहे. त्यानंतरच्या शैक्षणिक वर्षादरम्यान सदर विदयार्थ्यांना उत्तीर्ण झाल्यावर वसतिगृहात जागा रिक्त असल्यासच प्रवेश देण्यात येईल याबाबतची मला कल्पना आहे. मी ज्या संस्थेमध्ये प्रवेश घेतला आहे ती संस्था ज्या शहरात/गावात असेल आणि मी त्या शहरात/गावात वास्तव्यास असेल तर त्या वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी अपात्र ठरविण्यात आल्यास ते मला मान्य असेल.समांतर अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास , वसतिगृह प्रवेशास मी अपात्र ठरेल. मी कोणतीही नोकरी करीत नाही. मी अर्धवेळ पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला असल्यास वसतिगृह प्रवेशासाठी अपात्र ठरविल्यास ते मला मान्य असेल.प्रवेशासाठी अर्ज करताना अर्जातील माहिती व कागदपत्रे खोटी असल्याचे आढळुन आल्यास माझा वसतिगृह प्रवेश तात्काळ रदद करण्यात येईल याची जाणीव मला आहे. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेखाली निर्वाह भत्ता अनुज्ञेय नसेल अशा वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विदयार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश घेताना विहीत करण्यात आलेले व देय असणारे शुल्क प्रत्येक सत्राच्या सुरुवातीस भरणे माझेवर बंधनकारक राहील. माझी खाणावळीची सोय उपलब्ध असल्यास खानावळीचे प्रत्येक महिन्याचे आगाऊ मासिक शुल्क व्यवस्थापनाकडे जमा करील. माझे उन्हाळी सुटटीत महाविदयालयाचे विशेष वर्ग सीईटी समर ट्रेनिंग इ.कारणास्तव मला वसतिगृहात रहावयाचे असल्यास त्याबाबत निश्चित करणेत आलेले शुल्क मी भरीन.मला जर एक आठवडयापेक्षा जास्त दिवस बाहेर रहावयाचे असल्यास किंवा माझेकडुन वसतिगृहाचे नियम तोडण्याचा प्रयत्न मी केल्यास मला वसतिगृह

सोडण्याचे वसतिगृह प्रमुखाने आदेश दिल्यास मी ते मान्य करीन. वसतिगृह चालविणार संस्था ही वसतिगृहातील कोणत्याही विदयार्थ्यास गैरवर्तनुक/शिस्तभंग या कारणास्तव वसतिगृहातील प्रवेश संबंधित महाविदयालय/संस्थेचे प्राचार्य /संचालक यांच्या सहमतीने रदद केल्यास ते मला मान्य राहील.मी वसतिगृहात प्रवेश घेतल्यास वसतिगृहाचे नियम पाळणे आवश्यक आहे व वसतिगृहातील एकुण वर्तणुक वसतिगृह प्रशासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या नियमानुसार माझ्यावर बंधनकारक राहील. मी वसतिगृहात राहताना विहीत केलेल्या नियमांचे पालन करीन. त्यासाठी आवश्यक आचार संहिता वसतिगृह वार्डननी तयार करुन सत्राच्या सुरुवातीस सर्व विदयार्थ्यास व्यक्तीशः निदर्शनास आणुन दिल्यास ही आचार संहिता माझेवर बंधनकारक राहील. अन्यथा माझेविरुध्द योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार संबंधित संस्थेस आहेत याबाबत मला जाणीव आहे. माझी संस्थेविरुध्द/व्यवस्थापनाविरुध्द तक्रार असेल तर संबंधित जिल्हाधिकारी तसेच विभागीय सहसंचालक,तंत्रशिक्षण/उच्च शिक्षण यांच्याकडे लेखी तक्रार केल्यास मला मान्य असेल. माझी महाविदयालास/संस्थेचे प्राचार्य/संचालकाकडुन प्रत्येक सत्रात ७५ % हजेरीबाबतचे प्रमाणपत्र सादर करीन.तसे न केल्यास याबाबतची सबळ कारणीमीमांसा देणे माझेवर बंधनकारक राहील. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र २४९/तांशि-४, दिनांक १० ऑगस्ट २०१८ मधील सर्वसाधारण नियम मी वाचले असुन ते मला मान्य आहेत.तसेच सदर नियमांचा मी भंग करणार नाही.तसेच मला वसतिगृह प्रवेश मिळाल्यानंतर विहीत केलेल्या वसतिगृह नियमांचे पालन करीन.

**विदयार्थ्यांची स्वाक्षरी**

दिनांक :- ठिकाण :-

**अर्जदार विदयार्थ्याने अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे.**

१. मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची प्रत/चालु वर्षातील सामयिक प्रवेश परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्रत
२. महाराष्ट्र राज्याचा निवासी असल्यास दाखला. ( Domicile Certificate)
३. संबंधित तहसिलदार यांचेकडील रहीवास दाखला.

४. महाविदयालयामध्ये केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेश घेतल्याचा पुरावा .
५. पालक नोकरी करीत असल्यास आयकर नमुना १६-अ चा फॉर्म
६. आयकर पात्र पालकांच्या आयकर विवरणाची (Income Tax Return) प्रत.
७. आयकर पात्र नसलेल्या विदयार्थ्यांच्या पालकांनी तहसिलदार/सक्षम अधिका-यांनी स्वाक्षरी केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याची प्रत.
८. शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांकडुन प्रकृती चांगली असल्याबाबत तसेच ,संसर्गजन्य रोग नसल्याबाबत वैदयकीय प्रमाणपत्र
९. जन्म तारखेचा दाखला / वयाचा दाखला.
१०. आधार कार्ड
११. इतर आवश्यक कागदपत्रे
१२. ज्या विदयार्थ्यांना अगोदरच्या वर्षी अन्य वसतिगृहात प्रवेश मिळाला होता .अशा विदयार्थ्यांनी त्या वसतिगृहाच्या वार्ड व संबंधित महाविदयालयाचे प्राचार्य यांचे वर्तवणुकीबाबतचे प्रमाणपत्र तसेच मागील शैक्षणिक वर्षात ७५ % उपस्थिती असल्याचे संबधित महाविदयालयाचे प्राचार्य अथवा संचालक यांचे प्रमाणपत्र व सदर शैक्षणिक वर्षात दिलेली परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.